## प्रकरण पहिले

### कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचा पुर्वेइतिहास

# प्रकरण पहिले

## कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचा पुर्वेइतिहास

**प्रस्तावना :-**

सहकार म्हणजे परस्पर सहाय्य करणे, एकमेकास मदत करणे किंवा सर्वांच्या हितासाठी संघटित व एकत्रित काम करणे. 'सहकार' ही संकल्पना मानवी इतिहासा इतकीच जूनी आहे कारण एखादे काम स्व:त पुरते आणि स्वतंत्ररित्या करण्यापेक्षा ते कुटुंबातील, नात्यातील लोकांच्या साह्याने तसेच मित्रांच्या साह्याने केल्यास ते जलदगतीने, उत्कृष्ट दर्जाचे व मोठ्या प्रमाणात होते याची जाणीव मानवास अगदी सुरवातीच्या काळात झाली. मानव अगदी रानटी अवस्थेत देखील एकमेकांच्या मदतीने व परस्परांच्या सहकार्याने आपली प्रगती करीत होता. थोडक्यात एकत्रित राहण्याची एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होण्याची व एकत्रित काम करण्याची मानवी प्रवृत्ती सहज व नैसर्गिक आहे. सहकार हा वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. भारताच्या विकास प्रक्रियेतील सहकार हे प्रभावी साधन आहे.

सहकार चळवळीचा उगम इग्लंडमधून वडून आलेल्या औद्योगिक क्रांतीतून भांडवलशाही अर्थव्यवस्थेस शह देण्यासाठी झाला. औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलदार व श्रमीक असे दोन परस्पर विरोधी वर्ग अर्थव्यवस्थेत निर्माण झाले. देशातील उत्पादन साधनांचे काही मूठभर व्यक्तीच्या हाती केंद्रीकरण झाले त्याचा परिणाम म्हणून नफेबाजी, अप्रामाणिकपणा, पिळवणूक, अनिती या अनिष्ट प्रवृत्ती वाढीस लागल्या त्यामुळे वर्ग संघर्ष वाढत गेला व यातूनच सहकारी चळवळीचा प्रारंभ झाला. सन १८४४ मध्ये रॉशडेल गांवात २८ विणकर लोकांनी एकत्रित येवून सहकार भंडार निर्माण केले त्याचे नांव 'दि रॉशडेल इक्विटेबल पायोनियर्स सोसायटी' असे होते व हीच संस्था सहकारी चळवळीच्या इतिहासातील आद्य संस्था होय.

## १.१ सहकाराचा अर्थ :-

'कोऑपरेशन' हा इंग्रजी शब्द लॅटीन शब्द 'कोऑपरेरी' या शब्दापासून प्रचारात रुढ झाला आहे. 'कोऑपरेरी' या शब्दाचा शब्दशः अर्थ एकमेकांना मदत करणे असा होतो. म्हणजेच सहकारीता या संकल्पनेस वाव मिळतो. सहकारीतेमध्ये सर्वांच्या, सबंधिताच्या हितसंगोपनास आणि हितसंवर्धनास वाव दिला जातो. परिणामी सहकारीतेस समाजाच्या मूलभूत पायाचे महत्व लाभते. शिवाय सहकारीतेची प्रेरणा ही मुलभूत, उपजत असल्याने कालमानानुसार वृध्दींगत होत आहे.

## १:२ सहकाराच्या काही व्याख्या :-

सहकार या संकल्पनेचा व्यावहारिक अर्थ सहकारचे मानवी जीवनातील महत्व आणि आधुनिक सहकारी चळवळीची पार्श्वभूमी इत्यादि गोष्टींचा परामर्श घेतल्यावर सहकाराची व्याख्या करण्याचा प्रश्न निर्माण होतो. सहकाराची एकच समर्पक व सर्वांना मान्य होणारी व्याख्या देता येत नाही कारण वेगवेगळ्या कालखंडात परिस्थितीजन्य निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने वेगवेगळी विचार प्रणाली धारण करणाऱ्या राष्ट्रात सहकारी चळवळ सुरु झाल्याने सहकाराच्या व्याख्यात भिन्नता आढळते. तथापी आर्थिक विकासाचे व सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी साधन या नात्याने पुढील व्याख्यांच्या साह्याने सहकारी चळवळीचे स्वरुप समजून येते.

१) सी. आर. फे. :-

"समाजातील दुर्बल घटकांनी निस्वार्थी भूमिकेतून संयुक्तपणे व्यवहार करण्यासाठी आणि जिचे व्यवहार सभासद, सभासदत्वाची कर्तव्ये पेलण्यास तयार आहेत आणि सभासद ज्या प्रमाणात व्यवहार करतात त्या प्रमाणात त्यांना संस्थेतील लाभांश उपलब्ध होईल या अटीवर चालतात त्या संघटनेस सहकारी

संघटना म्हणतात.

"A Co-operative society, is an association for the purpose of joint trading originating among the weak & conducted always in an unselfish spirit on such terms that all who are prepared to assume the duties of membership may share in its rewards in proportion to the degree in which they make use of association")[1]

२) एच. कॅलव्हर्ट :- "आर्थिक हित संबंधाच्या उन्नतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तींनी एकत्रित येवून निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय"

("As a form of organisation where in persons voluntarily associate together as human beings on a basis of equality for the promotion of economic interest of themselves")[2]

३) प्रा. पॉल लॅम्बर्ट :- "स्व:ताच्या उपयोगासाठी व्यक्तीच्या समूहाने निर्माण केलेली आणि दिग्दर्शित केलेली, लोकशाही नियमानुसार चालवलेली आणि सभासद व एकुण समाज यांच्या सेवेसाठी स्थापण झालेली व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय."

(" A Co-operative society is an enterprise formed and directed by an association of users applying within itself the rules of democracy and directly intended to serve both its own member and the community as a whole")[3]

४) को-ऑपरेटीव्ह प्लॅनिंग कमीटीने केलेली व्याख्या :- "स्व:ताच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तींनी स्थापन केलेली संघटना

म्हणजे सहकारी संस्था होय"

("Co-operation is a form of organization in which persons voluntarily associate together on the basis of equality for the promotion of their economic interests")[4]

५) आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (रोम) :- "सामान्यत: मर्यादित साधने असलेल्या व्यक्तीनी स्वेच्छेने एकत्रित येवुन आपली समान उद्दीष्टे साध्य करण्यासाठी लोकशाही पध्दतीने व्यवसाय संघटनेचे नियंत्रण करण्यासाठी जी संस्था स्थापण केलेली असते तिला सहकारी संस्था म्हटले जाते. या सहकारी संस्थेच्या भाग भांडवलात संबंधीत व्यक्तींचा वाजवी हिस्सा असतो आणि संस्थेच्या नफा - तोट्यात तो वाजवी प्रमाणात सहभागी असतो."

("A Co-operative is an association of persons usually of limited means who have voluntarily joined together to achieve a common economic end through the formation of a democratically controlled business organisation making equitable contribution to the capital required and accepting a fair share of the risks and benefits of the undertaking" - International Labour Organisation : Rome)

१:३ सहकाराची वैशिष्टे :-

सहकाराच्या व्याख्या अनेक विचारवंत व तज्ञांच्या समीत्यानी दिल्या आहेत. परंतु कोणतीही एक व्याख्या परीपूर्ण दिसत नाही. त्यामुळे सहकाराची जी वैशिष्ठे किंवा लक्षणे विविध व्याख्याच्या मधून सांगितली आहेत ती लक्षात घेणे

आवश्यक ठरते.

१) सहकारी संस्था ही व्यक्तींची संघटना आहे . समान आर्थिक गरजा असणाऱ्या व्यक्ती एकत्रित येवून सहकारी संस्था स्थापन करीत असतात.

२) सहकारी संस्थेत भांडवलापेक्षा व्यक्तीस जादा महत्व असते.

३) सहकारी संस्था ही एक उद्योग संस्था आहे. ती उत्पादन, व्यापार सेवा इत्यादि आर्थिक व्यवहार करणारी उद्योग संस्था आहे. सहकारी संस्थाच्या सभासदानी स्व:ताच्या भांडवलावर व जबाबदारीवर व्यावसायिक धोके पत्करुन सुरु केलेले एक व्यावसायिक धाडस होय. सहकारी संस्थेत मानवी मूल्यास जादा महत्व आहे. परंतु सहकारी संस्था म्हणजे धर्मादाय संस्था नव्हे.

४) सहकारात ऐच्छिक संघटन आढळते. यात सक्ती किंवा जबरदस्तीला स्थान आढळत नाही. कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही सहकारी संस्थेचे सभासदत्व ऐच्छिक व खुले असते.

५) सहकार हे एक लोकशाही संघटन आहे. सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविला जातो. प्रत्येक सभासदास संस्थेच्या व्यवस्थापनात समान हक्क असतो. एक सभासद एक मत या तत्वाचा स्वीकार केलेला असतो. सहकार हे धर्मनिरपेक्ष, राजकारण निरपेक्ष संघटन होय.

६) सहकारी संस्था ही सेवाभाव वाढविणारी संस्था आहे. नफा मिळविणे हे प्रमुख उदिष्ट कधीच असत नाही. याचा अर्थ नफा मिळविला जात नाही असा नव्हे. तर सहकारी संस्था देखिल किमान नफा मिळवितात. परंतू त्यांच्या व्यवहारात सेवाभाव किंवा सेवावृत्ती यास प्रथम क्रमांकाचे व नफ्यास दुय्यम स्थान असते.

७) सहकारी संस्था ही समतेची प्रयोगशाळा होय. यात सर्व सभासदांना समतेची

वागणूक मिळते. सर्वांना समान संधी व सर्वांना समान सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

८) सहकारी संस्था हा एक व्यवसाय संघटन प्रकार आहे परंतु सहकारी चळवळी-कडे दूर दृष्टीने पाहिल्यास ती एक सामाजिक आर्थिक परीवर्तन घडविणारी चळवळ आहे हे लक्षात येते.५

थोडक्यात कोणत्याही सहकारी संस्थेचे सभासद सामूहिक प्रयत्नातून त्यांच्या समान गरजा पूर्ण करीत असतात त्यासाठी सहकाराची तत्वे पाळली जातात. जसे निस्वार्थवृत्ती, काटकसर, परस्पर सहाय्य, स्वावलंबन, स्वसेवा इत्यादि सहकारी चळवळीतून सामाजिक, आर्थिक आणि नैतिक प्रगती होत असते. त्यासाठी प्रत्येक सभासदाचा समान दर्जा, समान हक्क, नफा - तोट्याची न्याय वाटणी आणि सामूहिक नियंत्रण इत्यादी मार्गांनी सहकारी संस्था चालविली जाते.


१:४ भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थांचे वर्गीकरण :-

भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थांचे वर्गिकरण मुख्यत: दोन विभागात करता येते

१) कृषी सहकारी पतपुरवठा संस्था व

२) बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

भारतातील कृषी व बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थाचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येते




भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थाचे स्वरुप पिरॅमिड सारखे आहे. राज्य सहकारी बँक ही सर्व सहकारी संस्थाची शिखर बँक आहे. राज्य सहकारी बँका मध्यवर्ती बँकेस सलग्न आहेत. भारतातील प्रत्येक राज्यात एक राज्य सहकारी बँक आहे. आणि ही बँक जिल्हा स्तरावरील मध्यवर्ती सहकारी बँकेस अर्थ पुरवठा करते. तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका प्राथमिक सहकारी पतपुरवठा सहकारी संस्थाना मदत करतात. तसेच नागरी सहकारी बँका व पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था आणि राज्य औद्योगिक व मध्यवर्ती औद्योगिक सहकारी बँका बिगर कृषी सहकारी पतपुरवठा करतात. तथापी यातील शेवटच्या दोन प्रकारच्या संस्था फारशा आढळत नाहीत.

१:५ अ) <u>पगारदार सहकारी पतसंस्थेची व्याख्या :-</u>

"विशिष्ट कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या व समान उद्दिष्टे धारण करणाऱ्या पगारदार वर्गाकडून परस्पर मदत आणि सहकार तत्वाधिष्ठित स्थापन केलेली सहकारी संस्था म्हणजे पगारदार नोकरांची पतसंस्था होय."

१:५ ब) <u>पगारदार नोकरांच्या पतसंस्थेची उद्दिष्ठे :-</u>

पगारदार नोकरांच्या पतसंस्था अनेक सरकारी, निमसरकारी कार्यालयातून व उद्योगामधून स्थापन झालेल्या दिसतात. त्या स्थापण्या मागील प्रमुख उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

१) सभासदांना त्यांच्या वैयक्तिक जबाबदारीवर अल्प मुदतीचा कर्ज पुरवठा करणे
२) सभासदामध्ये काटकसर, बचत व परस्परांमधील सहकार्य वाढीस लावणे
३) सभासदांना जीवनावश्यक वस्तू योग्य किंमतीने उपलब्ध करुन देणे व त्यासाठी वस्तूंची खरेदी विक्री करणे
४) सभासदांना कर्ज दिल्यानंतर शिल्लक असलेल्या पैशाचा काही भाग व्यापारी बँकाकडे ठेवीच्या स्वरुपात किंवा सरकारी कर्ज रोख्यात गुंतविणे
५) आपल्या सभासदांचे कल्याण साध्य करण्याच्या हेतूने व त्यांची सावकारांच्या तावडीतून सुटका करण्यासाठी आवश्यक असलेले व्यवहार करणे

१:६ <u>नागरी सहकारी पतपुरवठा संस्थाची गरज :-</u>

देशात ग्रामीण पतपुरवठ्याचा विकास होवून त्याद्वारे शेती क्षेत्राकडे लक्ष दिले गेले. परंतू नागरी भागातील वरीष्ठ, मध्यम तसेच बिगर शेतकरी वर्गास शेती व्यतिरिक्त कारणासाठी कोणतीही व्यवस्था अस्तीत्वात नव्हती या वर्गाच्या आर्थिक गरजा भागविण्याच्या दृष्टीकोनातून नागरी भागात नागरी सहकारी बँकाचा विकास करण्याची कल्पना पुढे आली. १९१५ मध्ये मॅकलेगन समितीने नागरी भागातील वरीष्ठ व मध्यम वर्गास सर्वसामान्य बँकिंग

तत्वाची माहिती देण्यासाठी नागरी बँका उपयुक्त ठरतील असे स्पष्ट केले. १९३१ मध्ये बँकिंग चौकशी आयोगाने मर्यादीत देयता असणाऱ्या सहकारी संस्था किंवा नागरी सहकारी बँका नावाने ओळखल्या जाणाऱ्या या बँका आवश्यक वातावरण असेल तेथे नागरी वर्गाच्या हितासाठी स्थापन करण्यात याव्यात असे सुचविले त्यामुळे अशा बँकाच्या विकासास चालना मिळाली. व्यापारी बँका समाजातील सामान्य लोकांना विशेषत: कारागीर, लहान व्यावसायिक, घरगुती उत्पादन करणारे व्यवसायिक, मध्यमवर्गीय आणि स्थिर उत्पन्न असणाऱ्याना आर्थिक अडचणीच्या काळात वैयक्तिक व अन्य तारणावर कर्जे देत नाहीत त्यामुळे अशा व्यक्तींना कर्जासाठी शेवटी सावकाराकडे धाव घ्यावी लागते सावकार त्यांची पिळवणूक करतात. अशावेळी नागरी सहकारी बँका वैयक्तिक तारणावर कर्ज देवून त्यांना मदत करतात.

शहरी भागात नोकरी करणाऱ्या लोकांना त्यांच्या कर्ज विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी पगारदार नोकरांच्या पतसंस्था स्थापन केल्या. सर्वसाधारणपणे स्थिर उत्पन्न गटातील लोकांना योग्य व्याजाच्या दराने कर्ज पुरवठा करण्याचे काम या संस्था करीत. प्राथमीक, माध्यमिक शाळेतील, महाविद्यालयातील शिक्षक, इत्यादि व्यक्तींचा यात समावेश होतो.

## १:७ सहकारी पतपुरवठा संस्थाचा विकास :-

१९०४ च्या सहकारी पतसंस्थाच्या कायद्याने सहकार चळवळीची मुहुर्त-मेढ रोवली गेली. त्यानंतर मुंबई प्रांतात अनेक ठिकाणी सहकारी पतसंस्था स्थापन झाल्या व त्याद्वारे ग्रामीण भागाचा विकास करण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात अनेक क्षेत्रात सहकारी संस्था कार्य करीत होत्या त्यांच्या प्रगती संबधी पुढील कोष्टक मार्गदर्शक ठरते.

कोष्टक क्रमांक १:१

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची वाटचाल

| अ.नं. | बाब | १९६१ | प्रति सभासद प्रमाण | १९७१ | प्रति सभासद प्रमाण | १९८१ | प्रति सभासद प्रमाण | १९९० | प्रति सभासद प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकुण संस्था | ३१,५६५ | ०.००७५ | ४२,६०३ | ०.००४ | ६०,७४७ | ०.००४ | ९८,१८१ | ०.००३८ |
| २. | एकुण सभासद | ४२ | - | ८६ | - | १४८ | - | २५५ | - |
| ३. | वसुल भाग भांडवल (रुपये | ५३ | १२६.१९ | २३८ | २७६.७४ | ६०० | ४०५.४० | १,६६९ | ६५४.५० |
| ४. | पैकी शासनाचे (रुपये) | ८ | १९.०४ | ३९ | ४५.३४ | १०५ | ७०.९४ | ३३१ | १२९.८० |
| ५. | स्वानिधी (रुपये) | ७३ | १७३.८० | ३४५ | ४०१.१६ | १,२०७ | ८१५.५४ | ३,५४७ | १३९०.९८ |
| ६. | ठेवी (रुपये) | ७६ | १८०.९५ | ३१५ | ३६६.२७ | १,९३९ | १३१०.१३ | ९,७८७ | ३८३८.०३ |
| ७. | खेळते भांडवल (रुपये) | ३२६ | ७७६.१९ | १,४९० | १७३२.२५ | ५,२१० | ३५२०.२७ | २१,५३४ | ८४४४.७० |
| ८. | वर्षातील कर्जवाटप निव्वळ (रुपये) | ९५ | २२६.१९ | ३४८ | ४०४.६५ | १,११६ | ७५४.०५ | ५,९०५ | २३१५.६८ |
| ९. | लेखापरीक्षण वर्ग | - | - | - | - | - | - | - | - |
| १०. | 'अ' | ३,११० | ०.०००७ | ३,६०० | ०.०००४ | ३,६७० | ०.०००२ | ४,९५६ | ०.०००१ |
| ११. | 'ब' | १०,९२१ | ०.००२ | १२,३४३ | ०.००१४ | ११,६७० | ०.०००७ | १३,२२० | ०.०००५ |
| १२. | 'क' | ७,७५१ | ०.००१ | १६,१२२ | ०.००१८ | १८,८५४ | ०.००१२ | १५,८६८ | ०.०००६ |
| १३. | 'ड' | ३,०८८ | ०.०००७ | ३,८८६ | ०.०००४ | ३,४७७ | ०.०००२ | ८३८ | ० |
| १४. | वर्ग न दिलेल्या | २९१ | ० | ८६५ | ०.०००१ | ७७४ | ० | ३०८ | ० |
| १५. | लेखापरीक्षण न झालेल्या | ६,६४० | ०.००१ | ५,७८७ | ०.०००६ | ३९,२३१ | ०.००२६ | ६२,९८१ | ०.००२४ |

टिप :- १) रुपये कोटीत
२) सभासद लाखात

आधार :- महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात - १९९१,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

वरील कोष्टकात दाखविलेल्या संस्थामध्ये कृषी पतसंस्था, बिगर कृषी पतसंस्था, विपणन संस्था, उत्पादक संस्था, समाजसेवी सहकारी संस्था यांचा समावेश आहे. वरील कोष्टकावरुन असे दिसते की सन १९६१ ते सन १९९० या काळात महाराष्ट्रात सहकारी चळवळ प्रगतीपथावर आहे.

वरील कोष्टकात महाराष्ट्रातील सहकारी संस्थाची संख्या सन १९६१ ला ३१५६५ इतकी होती तिचे प्रतिसभासद प्रमाण ०.००७५ होते. ती संख्या १९९० ला ९८,१८१ झाली म्हणजेच संस्थांच्या संख्येत २११.०४% वाढ झालेली आहे. सन १९९० यावर्षी सहकारी संस्थाचे प्रतिसभासद प्रमाण ०.००३८ होते. याच कालावधीत सभासद संख्येत ५०७.१४% वाढ झाली.

सन १९६१ ते १९९० या कालावधीत भागभांडवलात मोठी वाढ झालेली दिसते ती ३०४९.०५% इतकी आहे. सन १९६१ या वर्षी प्रतिसभासद भागभांडवल १२६.१९ रुपये होते ते सन १९९० साली प्रतिसभासद ६५४.५० रुपये झाले.

याच कालावधीत स्वनिधीतही लक्षणीय वाढ झालेली दिसते ती ४७५८.९०% इतकी आहे. सन १९६१ यावर्षी स्वनिधी प्रतिसभासद १७३.८० रुपये होता तो सन १९९० यावर्षी १३९०.९८ रुपये झाला.

सन १९६१ ते सन १९९० या कालावधीत ठेवींची रक्कम १२७७७.६३% नी वाढलेली दिसते. सन १९६१ या वर्षी प्रतिसभासद ठेवींची रक्कम १८०.९५ रुपये होती. ती सन १९९० या वर्षी प्रतिसभासद ३८३८.०३ रुपये झाली.

याच कालावधीत खेळत्या भांडवलातही लक्षणीय वाढ झालेली आढळते. खेळते भांडवल ६५०५.५२% नी वाढलेले आढळते. सन १९६१ या वर्षी खेळते भांडवल प्रति-सभासद ७७६.१९ रुपये होते ते सन १९९० या वर्षी प्रतिसभासद ८४४४.७० रुपये झाले.

सन १९६१ ते सन १९९० या कालावधीत कर्जवाटपातही लक्षणीय वाढ झालेली आढळते. या कालावधीत कर्जवाटपात ६११५.७८% वाढ झालेली दिसते. सन १९६१ या वर्षी प्रतिसभासद कर्जवाटप २२६.११ रुपये होते ते १९९० या वर्षी प्रतिसभासद २३१५.६८ रुपये झाले.

वरील प्रमाणे महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या संख्येत, सभासद संख्येत, भागभांडवलात ठेवीत, कर्जपूरवठा या सर्व बाबतीत लक्षणीय वाढ झालेली दिसते मात्र हा विकास संख्यात्मक आहे. गुणात्मक दृष्टिकोणातून विचार केला असता आपणास असे दिसते की, सन १९६१ या वर्षी 'अ' वर्ग मध्ये असणाऱ्या संस्थांचे प्रमाण ९.८५ % होते ते सन १९९० या वर्षी ५.०४% आहे म्हणजेच त्या-मध्ये घट झालेली दिसते हीच परीस्थीती 'ब' वर्ग ' क' वर्ग 'ड' वर्ग आणि वर्ग न दिलेल्या संस्थाच्या बाबत दिसते. सन १९६१ साली यांचे प्रमाण अनुक्रमे ३४.५९% , २३.९२% , ९.७८% आणि ०.९२% होते ते सन १९९० या वर्षी अनुक्रमे १३.४७%, १६.१५%, ०.८५% , ०.३१% इतके झाले. मात्र लेखापरीक्षण न झालेल्या संस्था सन १९६१ या वर्षी २१.०३% होत्या त्या सन १९९० या वर्षी ६४.१४% इतक्या झाल्या म्हणजेच यात वाढ झालेली आढळते ही गोष्ट विकासाच्या दृष्टीने चिंतेची आहे.

सदर शोध निबंधाचा विषय सहकारी पतपुरवठा संस्थेशी संबंधीत असल्याने महाराष्ट्रातील एकूण सहकारी पतपुरवठा संस्था तसेच विशेषत: पगारदारांच्या सहकारी पतपुरवठा संस्थांच्या बाबत सविस्तर माहिती पाहणे आवश्यक ठरते. त्या दृष्टीकोनातून पुढील कोष्टक मार्गदर्शक ठरते.

## कोष्टक क्रमांक १:२

महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्थाचे संख्यात्मक वर्गिकरण

| वर्ष | प्रकार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | प्राथमिक शेती पतसंस्था | पगारदारांच्या सहकारी पतसंस्था | प्राथमिक बँका | नागरी पतसंस्था | जिल्हा मध्यवर्ती बँका | राज्य सहकारी बँका |
| १९६१ | १८,९९८ | -- | -- | -- | ३५ | २० |
| १९७१ | २०,०१४ | २,२२० | २६५ | ४७९ | २५ | २४ |
| १९८१ | १८,३८९ | ४,१५६ | ३४५ | ९७३ | २६ | ४४ |
| १९९० | १८,२९१ | ५,९४४ | ३७८ | ४,०८३ | ३० | ४६ |

संदर्भ :- महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात - १९९१

१९६१ ते १९७१ या काळात प्राथमिक शेती पत संस्थाच्या संख्येत वाढ झाली आसली तरी १९७१ नंतर या संस्थाच्या संख्येत घट झालेली आहे त्याचे महत्वाचे कारण म्हणजे ए.डी. गोरवाला समीतीच्या शिफारशीनुसार आर्थिक दृष्ट्या कमकुवत संस्थाची पुनर्रचना व पुनरुजीवनाचा कार्यक्रम सरकारने हाती घेतला.

१९६१ ते १९९० या काळात प्राथमिक बँका व राज्य सहकारी बँकांच्या शाखेमध्ये वाढ झालेली दिसते. याचा अर्थ सहकारी चळवळ महाराष्ट्रात सर्वत्र पसरत गेलेली आहे.

१९६१ ते १९९० या काळात जिल्हा मध्यवर्ती बँकांची संख्या घटलेली दिसते याचे कारण जिल्हा मध्यवर्ती बँकाचे आर्थिक पुनर्वसन केले गेले. तसेच एका जिल्ह्यात दोन बँका काही ठिकाणी होत्या त्यांचे एकत्रीकरण करुन आर्थिक

दृष्ट्या सबळ संस्था निर्माण केल्या.

नागरी पत संस्थाच्या संख्येत १९८१ ते १९९० या काळात ३११% इतकी लक्षणीय वाढ झालेली दिसते. याचे कारण ग्रामीण भागात बचत वाढीस प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण हे आहे.

१९७१ ते १९९० या काळात पगारदारांच्या सहकारी पत संस्थेत १६८% इतकी लक्षणीय वाढ झालेली दिसते. याचे कारण सरकारने पगारदार लोकांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी त्यांनाव संघटीत होण्यास प्रोत्साहन दिले. पगारदारांच्या सहकारी पतसंस्थाच्या सर्वांगीण विकासाचा आढावा कोष्टक क्र. १:३ मधील माहिती मार्गदर्शक ठरते.

[illegible]

## महाराष्ट्रातील पगारदार नोकरांच्या पतसंस्था

| अ.नं. | बाब | १९७१ | प्रति सभासद प्रमाण | १९८१ | प्रति सभासद प्रमाण | १९९० | प्रति सभासद प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संस्था | २,२२० | ०.००१ | ४,१५६ | ०.०२३ | ५,९४४ | ०.२२ |
| २. | सभासद | १,५०५ | - | १,७७४ | - | २,६३५ | - |
| ३. | भांडवल (रुपये) | ३,०७५ | २०४.३१ | १२,३७५ | ६९७.५७ | २९,५२५ | ११२०.४९ |
| ४. | स्वनिधी (रुपये) | ३,५९५ | २३८.७८ | १५,१२५ | ८५२.५३ | ३६,१८९ | १३७३.३९ |
| ५. | ठेवी (रुपये) | १,७४० | ११५.६१ | ७,५२० | ४२३.९० | १७,१४१ | ६५०.५१ |
| ६. | देय कर्ज (रुपये) | २३१ | १५.३४ | २,०२७ | ११४.२६ | २०,१८५ | ७६६.०३ |
| ७. | खेळते भांडवल (रुपये) | ६,०६३ | ४०२.८५ | २९,७७३ | १,६७८.२९ | ८९,४९१ | ३३९६.२४ |
| ८. | कर्जवाटप (रुपये) | ४,१७५ | २७७.४० | २५,०५२ | १,३५५.८० | ६१,४६४ | २३३२.५९ |
| ९. | येणे कर्ज (रुपये) | ३,६५३ | २४२.७२ | २३,८१७ | १,३२०.०१ | ६६,७६२ | २५३३.६६ |
| १०. | थकबाकी (रुपये) | ६१ | ४.०[illegible] | २९० | १६.३४ | २,५५५ | ९६.९६ |
| ११. | नफ्यातील संस्था | १,७९१ | ०.०००८ | ३,४१६ | ०.००१९ | ५,०६८ | ०.००१९ |
| १२. | नफा (रुपये) | २३१ | १५.३४ | ९४० | ५२.९८ | ३,९०१ | १४८.०४ |
| १३. | तोट्यातील संस्था | २०४ | ० | ४७२ | ० | ४८८ | ०.०००१ |
| १४. | तोटा (रुपये) | ३ | ०.१९ | १८ | १.०१ | ६१ | २.३१ |

टिप :- १) रुपये लाखात
२) सभासद हजारात

आधार :- महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात - १९९१,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १९७१ साली महाराष्ट्रातील पगारदार नोकरांच्या पतसंस्थेची संख्या २२२० इतकी होती. तिचे प्रतिसभासद प्रमाण ०.००१ होते. ती १९९० ला ५९४४ इतकी झाली. १९९० ला प्रतिसभासद प्रमाण ०.२२ इतके होते. या कालावधीत पगारदार नोकरांच्या पतसंस्थेत १६८% वाढ झालेली आहे. तसेच या काळात सभासद संख्या ७५% नी वाढलेली दिसते.

सन १९७१ ते १९९० या काळात भागभांडवलात मोठी वाढ झालेली दिसते ती ८६०% इतकी आहे. सन १९७१ या वर्षी प्रतिसभासद भागभांडवल २०४.३१ रुपये होते ते सन १९९० साली ११२०.४९ रुपये झाले.

याच कालावधीत स्वनिधितही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आढळते ती ९०६% इतकी आहे. सन १९७१ या वर्षी स्वनिधीचे प्रतिसभासद प्रमाण २३८.७८ रुपये होते. ते सन १९९० साली १३७३.३९ रुपये झाले.

सन १९७१ ते १९९० या कालावधीत ठेवींची रक्कम ८८५% नी वाढलेली दिसते. सन १९७१ या वर्षी प्रतिसभासद ठेवींची रक्कम ११५.६१ रुपये होती ती सन १९९० मध्ये प्रति सभासद ६५०.५९ रुपये झाले.

याच कालावधीत खेळत्या भांडवलात लक्षणीय वाढ झालेली दिसते. खेळते भांडवल १३७६% नी वाढलेले आढळते. सन १९७१ या वर्षी खेळते भांडवल प्रति सभासद ४०२.८५ रुपये होते ते सन १९९० साली प्रति सभासद ३३९६.२४ रुपये झालेले आहे.

सन १९७१ ते १९९० या कालावधीत देय कर्जातही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. ती ८६३८% इतकी आहे. सन १९७१ ला प्रति सभासद देय कर्ज १५.३४ रुपये होते ते सन १९९० या वर्षी प्रति सभासद ७६६.८३ रुपये झाले.

याच कालावधीत कर्ज वाटपातही लक्षणीय वाढ आढळते. ती १३७२% इतकी

आहे.

सन १९७१ या वर्षी प्रति सभासद कर्ज वाटप २७७.४० रुपये होते ते १९९० या वर्षी प्रति सभासद २३३२.५९ रुपये आढळते.

याच काळात थकबाकीचे प्रमाण ही जादा आहे. ते ४०८८% आहे. सन १९७१ या वर्षी प्रतिसभासद थकबाकीचे प्रमाण ४.०५ रुपये होते ते सन १९९० साली प्रति-सभासद ९६.९६ रुपये झाले.

सन १९७१ साली एकूण २२२० संस्थांपैकी १७९१ संस्था नफ्यात होत्या म्हणजे हे प्रमाण ८१% इतके होते तर याच नफ्यातील संस्थाचे प्रतिसभासद प्रमाण ०.०००८ होते व याच काळात २०४ संस्था तोट्यात होत्या म्हणजेच हे प्रमाण ९% होते. सन १९९० साली ५९४४ संस्थापैकी ५०६८ इतक्या संस्था नफ्यात होत्या म्हणजेच हे प्रमाण ८५% आहे याचा अर्थ ते पूर्वीपेक्षा ४% नी वाढले आहे. नफ्यातील संस्थाचे प्रतिसभासद प्रमाण १९९० ला ०.००१९ होते मात्र तोट्यात असणाऱ्या संस्थाची संख्या ४८८ इतकी आहे. हे प्रमाण ८% आहे. गेल्या २० वर्षाच्या काळात मात्र तोट्यातील आसणाऱ्या संस्थाच्या संख्येत फारशी वाढ झालेली दिसत नाही.

सन १९७१ ते १९९० या कालावधीत या संस्थाना मिळालेला नफा वाढला आहे व ती वाढ १५८८% आहे. सन १९७१ या वर्षी प्रतिसभासद नफ्याचे प्रमाण १५.३४ रुपये होते ते १९९० या वर्षी १४८.०४ रुपये झाले. असे असले तरी अशा संस्थाना होणाऱ्या तोट्याचे प्रमाण ही जादा आहे. तो १९३३% इतका वाढला आहे. ही गोष्ट विकासाच्या दृष्टीने चिंताजनक मानली जाते. सन १९७१ या वर्षी प्रतिसभासद तोटा ०.१९ रुपये होता. तो १९९० या वर्षी प्रतिसभासद २.३१ रुपये झाला.

## १:८ कासेगांव शिक्षण संस्थेचा पुर्वेइतिहास :

कासेगांव हे सांगली जिल्ह्यातील, वाळवे तालुक्यातील, पूणा-बेंगलोर हमरस्त्यावरील एक महत्वाचे गांव आहे. कासेगांव शिक्षण संस्थेची स्थापना कै.मा.राजारामबापू पाटील यांनी १९४५ मध्ये केली या शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा उद्देश असा होता की, जे विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहेत ते शिक्षणा पासून वंचित राहू नयेत. तसेच ग्रामीण भागतून न येणाऱ्या विद्यार्थ्यींनींचा सर्वांगीण विकास व्हावा. कासेगांव शिक्षण संस्थेची बॉंबे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० व सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० खाली रजिस्ट्रेशन झाले. सध्या या संस्थेच्या २८ शाखा आहेत. या शाखेत काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या ५७५ आहे व १० हजार इतके विद्यार्थी शिक्षण घेण्याचे काम करीत आहेत. कासेगांव शिक्षण संस्था ही सांगली जिल्हातील महत्वाची शैक्षणिक संस्था आहे.

## १:९ अध्ययन क्षेत्र : रुपरेखा व संशोधन पध्दत :

कासेगांव शिक्षण संस्था, कासेगांव या संस्थेतील सेवकांनी ३० ऑगस्ट १९७४ रोजी "कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांचो सहकारी पतसंस्था लि. कासेगांव" रजि.नं. एस ए एन / बी एन के ३०६ / ७४ स्थापन केली. संशोधनाचा मुख्य हेतु या अर्थाने आम्ही या पतसंस्थेचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १:१० उद्दिष्टे :

या अभ्यासाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१)   कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिचा थोडक्यात ऐतिहासिक आढावा घेणे.

२)   कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिच्या भांडवल रचनेचे परिक्षण करणे.

३)   कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहाकरी पतसंस्था लि., कासेगांव हिच्या ठेव रचनेचे परिक्षण करणे.

४)   कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिच्या कर्ज पुरवठा रचनेचे परिक्षण करणे.

५)   कासेगांव शिक्षण सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिच्या व्यवस्थापकीय व वित्तीय प्रश्नांचा अभ्यास करणे व त्यावरती उपाय सुचविणे.

१:११   **<u>संशोधनाचा आराखडा :</u>**

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिने आपल्या कार्यक्षेत्रात सहकार चळवळ वाढविण्याचा जाणीव पूर्वक प्रयत्न केला आहे त्यामुळे 'कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव - एक व्यष्टी अभ्यास' हे संशोधनाचे क्षेत्र निवडले आहे. या पतसंस्थेचा अभ्यास करताना संस्थेचे भांडवल, गुंतवणूक, ठेवी, कर्जवाटप इत्यादि बाबतची माहिती संस्थेचे वार्षिक अहवाल, हिशोब पत्रके इत्यादिचा वापर करुन संकलित केली आहे. त्याप्रमाणे आवश्यक असणारी प्राथमिक माहिती संस्थेचे चेअरमन, कर्मचारी वर्ग यांचेशी प्रत्यक्ष भेटून मिळविली आहे.

१:१२ **<u>कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव :</u>**

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव

हिची स्थापना ३० ऑगस्ट १९७४ साली झाली. यावेळी संस्थेचे पहिले चेअरमन म्हणून श्री. विलास ज्ञानदेव पाटील यांची निवड करणेत आली.

ही संस्था स्थापन करणेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे होती.

१) सभासदांच्यामध्ये काटकसर व जबाबदारीचे आर्थिक व्यवहार वाढीस लावणे.

२) सभासदांच्या गरजा भागविण्यासाठी कर्ज पुरवठा करणे.

३) संस्थेस आवश्यक असणारे व सभासदांना आवश्यक असणारे भांडवल जमा करणे.

४) सभासदांच्यामध्ये सहकार्याची भावना वाढीस लावणे व त्यांच्यात सहकार चळवळीचा प्रसार करणे.

१:१३ **कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ:**

संचालक मंडळ म्हणजे संस्थेची व्यवस्था, कामकाज पहाणारे सर्वोच्च मंडळ होय. संचालक मंडळ संस्थेचे धोरण ठरविते.

आज पतसंस्थाना नागरी पतपुरवठा क्षेत्रात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे कारण सभासदांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे त्याचबरोबर त्यांच्यात सहकार चळवळ वाढीस लावणे, काटकसर व जबाबदारीची जाणीव निर्माण करुन देणे इत्यादी महत्वपूर्ण कामें यांचे मार्फत पार पाडली जातात. संस्थेची प्रतिमा ही संस्थेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यानी दिलेल्या सेवा सवलतीवरती अवलंबून असते. त्यासाठी संस्थेचे कर्मचारी हुशार, कार्यक्षम व सेवाभावी असावेत. तरच सभासद व ठेवीदार संस्थेकडे आकर्षित होतील.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिचे व्यवस्थापन व कामकाज पहाण्यासाठी सुरवातीस ९ जणांचे संचालक मंडळ

व  एक मानद आधिकारी होते. त्याच्यातूनच एक अध्यक्ष व एका उपाध्यक्षाची निवड केली  जाई. सध्यपरिस्थीत संचालकाची संस्था पूर्वीइतकीच कायम आहे. परंतु  मानद अधिकारी कोणीही नाही. त्याचप्रमाणे संस्थेचा एक सेक्रेटरी व एक अंतर्गत लेखा परीक्षक आहेत.

संस्थेमार्फत पूर्वी दर तीन वर्षांनी गुप्त मतदान पध्दतीने निवडणूका घेतल्या जात परंतु १९८८ पासून नवीन कायद्याप्रमाणे दर पाच वर्षांनी गुप्त मतदान पद्धतीने निवडणूका घेतल्या जातात व पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते प्रत्येक सभासदास एक मत देण्याचा अधिकार आहे.

संस्थेच्या संचालकांना मिटींग भत्ता प्रवास खर्च दिला जातो.

१:१४ <u>तपासणी वर्ग</u>

प्रत्येक सहकारी संस्थेच्या हिशेबाची तपासणी सहकारी खात्यामार्फत प्रत्येक वर्षी केली जाते व तपासणी नंतर संस्थेला तपासणी वर्ग दिला जातो. सहकारी निबंधकानी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार हा तपासणी वर्ग दिला जातो. तपासणी वर्ग देताना संस्थेची कार्यक्षमता, आर्थिक स्थैर्य, कर्मचारी वर्ग, अंतर्गत नियंत्रण, थकबाकी, व्यवस्थापन कौशल्य, हिशेब पुस्तकातील व्यवस्थितपणा, पूर्वीच्या अहवालातील दोषांचे समाधानकारक दुरुस्ती इत्यादि गोष्टींचा विचार केला जातो.

कासेगांव  शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिची सरकार नियुक लेखा परीक्षकांनी प्रत्येक वर्षी तपासणी केली असून संस्थेच्या स्थापने पासुन 'ब' वर्ग १९८१-१९८२ पर्यंत दिला आहे व १९८२-१९८३ नंतर संस्थेचे कामकाज, प्रगती पाहून आजअखेर 'अ' वर्ग कायम ठेवला आहे ही गोष्ट संस्थेच्या कार्यात्मक गुणवत्तेच्या विकासाची दर्शक आहे.

१:१५ **सभासदत्व :**

कासेगांव शिक्षण संस्थेच्या कोणत्याही कायम सेवकास या पतसंस्थेचे सभासद होता येते. या संस्थेचे जे सभासद होतील ते नियमीत सभासद असतात. नाममात्र सभासद घेतले जात नाहीत. नियमीत सभासद हे संस्थेचे भागधारक असतात त्यांना नफ्यात लाभांश मिळण्याचा आधिकार व मताचा आधिकार असतो. पतसंस्थेच्या नियमावलीनुसार पुढील अटी पूर्ण करणाऱ्या सेवकास संस्थेचे सभासदत्व प्राप्त होवू शकते.

१) तो १८ वर्षाचा असावा. करार करण्यास लायक असावा.

२) कासेगांव शिक्षण संस्थेत तो कायम स्वरुपी सेवक असावा

३) त्याची वर्तणूक चांगली असावी

४) त्याची पत चांगली असावी, त्याच्याकडे सरकारी थकबाकी असू नये. त्याच्यावरती कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा असू नये.

५) त्याचा सदस्य होण्याबाबतचा लेखी अर्ज समीतीतील एकुण सदस्यांच्या निम्म्यापेक्षा जादा सदस्यांनी बहुमताने मंजुर केला असला पाहिजे.

६) त्याने एक रुपया प्रवेश फी दिली असली पाहिजे.

७) त्याने किमान पाच शेअर खरेदी केले पाहिजे व त्या शेअर्सची पूर्ण किंमत भरली पाहिजे.

८) आधिनियम, नियम व उपविधी यातील अटी त्याने पुऱ्या केल्या असल्या पाहिजेत.

९) तो समान उद्देश असणाऱ्या इतर संस्थेचा सदस्य नसावा.

१०) त्याचे वेतन अदा करणाऱ्या आधिकाऱ्यास त्यांचे वेतनातून

संस्थेची वर्गणी, कर्जाची रक्कम व इतर रक्कम कपात करुन घेण्याचे लेखी अधिकार पत्र लिहून दिले पाहिजे.

सभासदाने गैरवर्तन केल्यास किंवा नियमांचे उल्लघंन केल्यास सभासदास काढून टाकता येते. सर्वसाधारण सभेस हजर असणाऱ्या व मताचा अधिकार असणाऱ्या सदस्यांच्या संख्येच्या ३/४ मताने कोणत्याही सदस्यास खालीलपैकी कोणत्याही कारणा करीता संस्थेचे सभासदत्व रद्द करता येईल.

१) तो सभासदाच्यां अटी पाळत नसेल

२) तो सतत थकबाकीत असेल

३) संचालक मंडळाच्या मते जर तो संस्थेच्य हितसंबंधास बाधा आणत असेल व संस्थेस बदनाम करत असेल

४) त्याची वर्तणूक चांगली नसेल

५) त्याच्यावरती कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा सिध्द झाला असेल

६) जर त्याने लागोपाठ तीन महिन्याची वर्गणी दिली नसेल

७) जर त्याचे दिवाळ निघाले असेल

**सभासद संख्येत वाढ :**

कासोगांव शिक्षण संस्थेच्या कायम सेवकांच्या संख्येवरती ही वाढ अवलंबून असते. जसजशी कायम सेवकांच्या संख्येत वाढ होईल तस तशी संस्थेच्या सभासद संख्येत वाढ होत जाते.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या सभासद संख्येत झालेली वाढ पुढील कोष्टकावरुन स्पष्ट होते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कोष्टक क्रमांक १:४
सभासद संख्येतील वाढ

| अ.नं. | वर्ष | सभासद | सभासद संख्येतील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १. | १९७४-७५ | उपलब्ध नाही | - |
| २. | १९७५-७६ | उपलब्ध नाही | - |
| ३. | १९७६-७७ | २०८ | - |
| ४. | १९७७-७८ | २२२ | ६.७३ |
| ५. | १९७८-७९ | २२९ | २.७० |
| ६. | १९७९-८० | २५३ | १०.४८ |
| ७. | १९८०-८१ | २७५ | ८.६९ |
| ८. | १९८१-८२ | २८२ | २.५४ |
| ९. | १९८२-८३ | ३१२ | १०.६३ |
| १०. | १९८३-८४ | ३१२ | - |
| ११. | १९८४-८५ | ३१९ | २.२४ |
| १२. | १९८५-८६ | ३२२ | ०.९४ |
| १३. | १९८६-८७ | ३२४ | ०.६२ |
| १४. | १९८७-८८ | ३३९ | ४.६२ |
| १५. | १९८८-८९ | ३५३ | ४.१२ |
| १६. | १९८९-९० | ३६४ | ३.११ |
| १७. | १९९०-९१ | ३७९ | ४.१२ |
| १८. | १९९१-९२ | ३९१ | ३.१६ |

आधार : कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव हिचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवालानुसार.

वरील कोष्टाकावरुन आपणास असे दिसून येते की सभासद संख्येत प्रतिवर्षी होणाऱ्या वाढीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. म्हणजेच सभासद संख्येत होणारी वाढ अत्यंत मंद गतीने होत आहे. याचे कारण कासेगांव शिक्षण संस्थेचा प्रत्येक वर्षी होणारा शाखा विस्तार हा मर्यादित आहे. तसेच कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सभासद होण्यासाठी सेवक हा पूर्ण वेळ व कायम नोकरीत असलाच पाहिजे अर्धवेळ किंवा तासिका तत्वावर आधारित असणाऱ्या सेवकास या पतसंस्थेचे सभासद होता येत नाही. त्याचप्रमाणे विना-अनुदान तत्वावरती असणाऱ्या शाखांच्यामधील सेवक या पतसंस्थेचे सभासद झालेले दिसत नाहीत. त्याचबरोबर प्रत्येक वर्षी कांही सभासद सेवानिवृत्त होतात त्यामुळेही त्याचा परीणामही सभासद संख्या मंद गतीने वाढीवरती होत आहे.

## संदर्भ सुची :


1) C.R. Fay, Co-operation at Home and Abroad, Vol.I, P- 5

2) H. Calvert, The Law and Principles of Co-operation, P-9

3) Lambert, The Social Philosophy of Co-operation (1963)

4) Report of the Co-operative Planning Committee (1946)

5) Dr. B.S. Mathur, Co-operation in India.(1989), P-5